**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपतींच्या हस्ते डॉ. जयंत नारळीकर यांना मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार प्रदान, राज्यातल्या ६ शास्त्रज्ञांचा विज्ञान श्री आणि विज्ञान युवा पुरस्कारानं गौरव

- राज्यात महापालिका निवडणुकांसाठी ठाकरे बंधू आणि पवार कुटुंब एकत्र येण्याच्या तयारीत

- राहुरी विधानसभा मतदारसंघात पुढच्या महिन्यात विशेष मतदार यादी पुनरीक्षण

- प्रसिद्ध हिंदी साहित्यिक आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विनोदकुमार शुक्ल यांचं निधन

आणि

- भारत आणि श्रीलंकेदरम्यान महिलांच्या टी-ट्वेंटी मालिकेतला दुसरा सामना विशाखापट्टणममध्ये सुरू

**<><><><><>**

जगविख्यात खगोलशास्त्रज्ञ दिवंगत डॉ. जयंत नारळीकर यांना आज मरणोत्तर विज्ञानरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. राष्ट्रपती भवन इथं झालेल्या या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आयुकाचे संचालक आर. श्रीयानंद यांनी हा पुरस्कार स्वीकारला. याशिवाय देशभरातल्या एकूण ८ शास्त्रज्ञांना विज्ञान श्री, १३ जणांना विज्ञान युवा आणि एका समुहाला विज्ञान समुह पुरस्कारानं गौरवण्यात आलं. त्यात राज्यात विविध संशोधन संस्थांमधल्या ६ जणांचा समावेश आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधींकडून

**- - *होल्ड व्हाइस कास्ट* - - -**

*(मुंबईतल्या भाभा अणुशक्ती केंद्राचे डॉक्टर युसुफ मोहम्मद शेख यांना अणू ऊर्जा क्षेत्रासाठी, मुंबईतल्या टाटा मूलभूत संशोधन संस्थेतले प्राध्यापक महान एम. जे. यांना गणितासाठी, मुंबईतल्या इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे कुलगुरू प्राध्यापक अनिरुद्ध पंडित यांना अभियांत्रिकीसाठी आणि नागपूरच्या नीरीचे डॉक्टर एस. वेंकट मोहन यांना पर्यावरण क्षेत्रातल्या उल्लेखनीय कार्यासाठी विज्ञान श्री पुरस्कारानं राष्ट्रपतींनी गौरविलं.*

*जैविक शास्त्रासाठी बेंगळुरूच्या जीवशास्त्रीय संस्थेच्या डॉक्टर दीपा आगाशे, मुंबईच्या टीआयएफआरचे प्राध्यापक सब्यसाची मुखर्जी यांना गणितासाठी आणि पुण्यातल्या आयुकाचे प्राध्यापक सुहृद मोरे यांना पदार्थ विज्ञान क्षेत्रातल्या कामगिरीसाठी विज्ञान युवा या पुरस्कारानं गौरवण्यात आलं.)*

**<><><><><>**

देशातली आर्थिक गुंतवणूक आणि वाढीसाठी सुरक्षा एक महत्वाची बाब असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. इंटेलिजन्स ब्यूरो म्हणजे भारतीय गुप्तवार्ता विभागाच्या नवी दिल्लीत झालेल्या ३८ व्या शताब्दी स्मृती व्याख्यानात त्या बोलत होत्या. भारत सध्या बहुआयामी सुरक्षा आव्हाने आणि धोक्यांचा सामना करत आहे, सीमावर्ती भागातील तणाव, दहशतवाद आणि अतिरेकी कारवाया, बंडखोरी आणि जातीय कट्टरता या सुरक्षेच्या दृष्टीने चिंतेच्या बाबी आहेत, असंही त्या यावेळी म्हणाल्या.

**<><><><><>**

महापालिका निवडणुकांसाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यातल्या युतीची घोषणा उद्या होणार असल्याची माहिती खासदार संजय राऊत यांनी आज मुंबईत दिली. दोन्ही पक्षांमध्ये जागा वाटप पूर्ण झालं असून मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा भाईंदर, नाशिक आणि पुणे महापालिका निवडणूक दोन्ही पक्ष एकत्र लढवतील, असं राऊत म्हणाले.

**- होल्ड - संजय राऊत बाइट - - -**

**<><><><><>**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत शरद पवार आणि अजित पवार यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्रितरित्या निवडणूक लढवू शकतात, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलताना दिली

**.... होल्ड- बाईट- शशिकांत शिंदे**

येत्या शुक्रवारपर्यंत या आघाडीची घोषणा होऊ शकते, असं अजित पवार यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली. या आघाडीत काँग्रेसही सोबत असू शकते. यासंदर्भात अजित पवार यांचा फोन आला होता, अंतिम निर्णय

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि इतर नेत्यांशी चर्चा घेऊन होईल, असं आमदार सतेज पाटील म्हणाले.

<><><><><>

केंद्रीय निवडणूक आयोग राज्यातल्या राहुरी विधानसभा मतदारसंघात SIR अर्थात विशेष मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया राबवणार आहे. शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळं ही जागा रिक्त आहे. याअंतर्गत २९ डिसेंबरपर्यंत मतदान केंद्रांचं सुसूत्रीकरण होईल. ३ जानेवारीला मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध होईल. ३ जानेवारीपासून २४ जानेवारीपर्यंत त्यावर आक्षेप नोंदवता येतील आणि दावे दाखल करता येतील. ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यावर १४ फेब्रुवारीला अंतिम मतदारयादी प्रसिद्ध होईल, असं निवडणूक आयोगानं कळवलं आहे.

<><><><><>

प्रसिद्ध हिंदी साहित्यिक आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विनोदकुमार शुक्ल यांचं आज छत्तीसगडमध्ये रायपूर इथं निधन झालं. ते ८९ वर्षांचे होते. दिवार में एक खिडकी रहती थी, नौकर की कमीज, खिलेगा तो देखेंगे, एक छुपी जगह या त्यांच्या कादंबऱ्या खूप गाजल्या. त्यातल्या नौकर की कमीजवर चित्रपटही निघाला होता. गेल्या महिन्यातच त्यांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. साहित्य अकादमी सह अनेक संस्थाचे पुरस्कार त्यांना मिळाले होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुक्ल यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

<><><><><>

देशात प्रसूतीसाठी रुग्णालयांमध्ये भरती होण्याचं प्रमाण ८९ टक्क्यांपर्यंत वाढल्यानं माता मृत्यू दरात लक्षणीय घट झाली आहे, असं केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी आज सांगितलं. मध्य प्रदेशात धार आणि बेतूल जिल्ह्यांमधल्या वैद्यकीय महाविद्यालयांची पायाभरणी केल्यानंतर ते बोलत होते. सुमारे ५६० कोटी रुपये खर्चून ही महाविद्यालयं उभारली जाणार असून खासगी आणि सार्वजनिक भागीदारीतून ती चालवली जाणार आहेत.

<><><><><>

विकसित भारत जी रामजी योजनेसाठी एक लाख ५१ हजार कोटी रुपये तरतूद केली असल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज दिली.

**होल्ड- शिवराज सिंग चौहान**

<><><><>

तस्करी आणि अंमली पदार्थांच्या पुरवठ्याशी संबंधित प्रकरणांमधे दिल्ली पोलिसांना हवा असलेला आरोपी ऋतिक बजाज याला संयुक्त अरब अमिरातीतून भारतात आणलं असल्याचं सीबीआयनं आज सांगितलं. दिल्ली पोलिसांच्या विनंतीवरुन सीबीआयनं बजाजविरुद्ध इंटरपोलच्या मदतीनं ऑक्टोबरमधे रेड कॉर्नर नोटीस जारी केली होती.

<><><><>

फरार उद्योगपती विजय मल्ल्या याचा भारतात परत येण्याचा कधी विचार आहे, अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयानं आज त्याच्या वकिलांकडे केली. मल्ल्या यानं आधी न्यायालयात हजर राहावं, त्याशिवाय या याचिकांवर सुनावणी होणार नाही, अशी ताकीद, त्याच्या वतीनं दोन याचिका दाखल करणाऱ्या वकिलांना न्यायालयानं दिली. एका याचिकेत मल्ल्या यानं आपल्याला फरार आर्थिक गुन्हेगार जाहीर करण्याला आव्हान दिलं आहे. परदेशी राहून अशा प्रकारची याचिका दाखल करण्याबद्दल सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी विरोध दर्शवला.

<><><><>

ओडिशातल्या मलकानगिरीमध्ये २२ माओवाद्यांनी आज आत्मसमर्पण केलं. यात १० महिलांचा समावेश आहे.

<><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर यांनी आज कोलंबो इथं श्रीलंकेचे परराष्ट्र मंत्री विजिता हेरथ यांची भेट घेतली. श्रीलंकेचे आरोग्यमंत्री नलिंदा जय, कामगार आणि उपअर्थमंत्री अनिल जयंत तसंच उपपर्यटन मंत्री रुवान रणसिंघे हेही उपस्थित होते. दितवाह चक्रीवादळानंतर श्रीलंकेतल्या पुनर्निर्माण कार्याला भारत पूर्ण सहकार्य करेल, असं आश्वासन दिल्याचं त्यांनी समाज माध्यमांवरच्या पोस्टमध्ये सांगितलं. विरोधी पक्षनेते साजित प्रेमदासा यांचीही त्यांनी भेट घेतली आणि चक्रीवादळानंतरच्या परिस्थितीबद्दल चर्चा केली.

<><><><>

महिला क्रिकेटमधे, भारत आणि श्रीलंका यांच्यातल्या टी-ट्वेंटी मालिकेतला दुसरा सामना आज विशाखापट्टणम इथं सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा श्रीलंकेच्या १६ षटकात ३ बाद ९९ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटना आयसीसीच्या मानांकनात भारताची अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्मा टी ट्वेंटी प्रकारातली सर्वोत्कृष्ट गोलंदाज ठरली आहे. विशाखापट्टणम इथं श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात केलेल्या कामगिरीनंतर दीप्तीच्या मानांकनात सुधारणा झाली आहे. भारताची मध्यमगती गोलंदाज अरुंधती रेड्डी ५ स्थानं वर चढून ३६व्या क्रमांकावर पोहोचली आहे. फलंदाजीच्या क्रमवारीत दक्षिण आफ्रिकेच्या लॉरा वोल्वार्टने स्मृती मानधनाला मागे टाकत अव्वल स्थान पटकावलं आहे.

//<><><><><>//